# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(१) ५६७१ (०८-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगरुळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीच्या बांधकामास विलंब होत असल्यामुळे गरजू व गरीब रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना वारंवार लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्यापी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

मंगरूळ चव्हाळा (ता.नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती) नवीन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम माहे मे, २०१५ अखेर पूर्ण झालेले होते. तथापि विद्युत आणि पाणी पुरवठ्याच्या कामामुळे सदर इमारत हस्तांतरण करण्यास विलंब झाला होता.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून पाणी व विद्युतीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये बाह्यरूग्ण, आंतररूग्ण सेवा दिल्या जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लाखनी (जि.भंडारा) येथील ग्रामीण रुग्णालयात सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(२) २१५०९ (१९-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखनी (जि.भंडारा) येथील ग्रामीण रुग्णालयात सोयी सुविधांचा अभाव असून डॉक्टर व कर्मचाऱ्यांची पदे कित्येक दिवसांपासून रिक्त आहेत. प्रसुतीचे वेळी डॉक्टरांना अडचण निर्माण होत असून औषधे साठवून ठेवण्यासाठी सोयी नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्हयातील बहुतेक ग्रामीण रुग्णालयामध्ये सोयी सुविधांचा अभाव असून रिक्त पदांमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे डॉक्टर आणि रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रुग्णालयातील सोयी सुवधिांचा आढावा घेऊन रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

लाखनी येथील ग्रामीण रूग्णालय नवीन इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेले असून तेथे आवश्यक सोयी व सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच वैद्यकीय अधिक्षक पद रिक्त असून वैद्यकीय अधिकारी यांची मंजूर ३ पदे भरली आहेत. तसेच गट क व गट-ड मधील प्रयोगशाळा तंत्रज्ञ-१ पद, प्रयोगशाळा सहायक-१ पद, क्ष किरण तंत्रज्ञ-१ पद व शिपाई-१ पद रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

रूग्णालयात येणा-या रूग्णांना उपलब्ध साधनसामुग्री व औषधोपचार वेळीच पुरविण्यात येतात.

(३) रिक्त पदे पदोन्नतीने, सरळसेवा भरतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

**वाशिम जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयात सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(३) २९७२८ (२३-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयातील आरोग्य सेवेचे त्रास बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णांना होत असून या विभागातील डॉक्टरांची अनुपस्थिती, एक्स-रे अव्यवस्थित, औषध वितरणात कमालीचा वेळ, अपंगांना प्रमाणपत्रासाठी माराव्या लागणाऱ्या चकरा, संगणकात सतत बिघाड इत्यादींमुळे रुग्णांना मानसिक त्रास होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोपचार रुग्णालयात सोयीसुविधा पुरविण्यासह रुग्णाना वेळेत सुविधांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) वैद्यकीय अधिकारी, विशेषज्ञ यांच्या मंजूर १८ पदांपैकी ३ पदे भरली आहेत. उर्वरीत रिक्त १५ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच २९ मंजूर वैद्यकीय अधिकारी गट अ पदांपैकी २४ स्थाई व ५ बंधपत्रित असे एकूण २९ पदे भरलेली आहेत. सद्यस्थितीत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून रूग्णालयीन काम सुरळीत पार पाडून रूग्णांवर आवश्यक उपचार केले जातात. क्ष किरण विभाग पूर्णपणे कार्यरत असून एक्स रे ची गुणवत्ता चांगली आहे. औषधी विभागामध्ये नियमित व वेळेवर औषध पुरवठा करण्यात येतो. अपंगांना प्रमाणपत्र देण्यासाठी महिन्यामधून दोन ऐवजी चार शिबिरे घेण्यात आली. व अपंगांना वेळेवर प्रमाणपत्र देण्यात आली आहेत. संगणकामध्ये कोणत्याही प्रकारचा बिघाड नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयातील पदे मंजूर करण्याबाबत

**(४) ३०२२६ (२३-०१-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील जनतेच्या आरोग्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाला (ट्रामा केअर) मंजूरी मिळून दोन वर्षात इमारत बांधून पूर्ण झाली असून सात वर्षापासून वैद्यकिय अधिकारी, तज्ञ डॉक्टर व कर्मचारी यांची भरती न केल्याने सदर उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित झाले नाही, हे खर आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर उपजिल्हा रुग्णालय (ट्रामा केअर) ला वैद्यकिय अधिकारी, तज्ञ डॉक्टर आणि कर्मचारी यांची पदे मंजूर करुन पदे भरुन रुग्णालय सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) ग्रामीण रूग्णालय, सटाणा येथील ट्रॉमा केअर युनिटकरीता दि. ०२.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये पदनिर्मिती करण्यात आली आहे. पदभरतीची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयात १०० खाटांचे रुग्णालय व ट्रॉमाकेअर युनिट मंजूर करण्याबाबत

**(५) ३५७४५ (२३-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर असून सिन्नर तालुक्याची लोकसंख्या, एक शासकीय व एक औद्योगिक सहकारी वसाहत, इंडिया बुल्स (रतन इंडिया) चा सेझ प्रकल्प, नाशिक-पुणे, मुंबई-शिर्डी महामार्गावरील वाढत्या रहदारीमुळे रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण, त्यामध्ये मृत पावणाऱ्या, जखमी होणाऱ्यांचे प्रमाण बघता सिन्नर येथे अद्ययावत १०० खाटांचे रुग्णालय व १ ट्रॉमाकेअर युनिट मंजूर करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.आरोग्य मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने ट्रामाकेअर युनिट मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) ग्रामीण रूग्णालय, सिन्नर येथे दि. १७.०१.२०13 च्या शासन निर्णयान्वये ट्रॉमा केअर युनिट मंजूर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील अपुऱ्या सोयी सुविधेबाबत

**(६) ४२१११ (१२-०५-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्याची लोकसंख्या सुमारे २ लाख ८५ हजार ३२१ असून एवढ्या प्रमाणावर असलेल्या लोकसंख्येचा भार येथील ग्रामीण रुग्णालयावर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी अपु-या सुविधा असतानाही गेल्या आठ महिन्यांच्या काळात वेगवेगळया आजाराच्या ५२ हजार रुग्णांवर उपचार करण्यात आले असून येथे केवळ २६ कर्मचारी कार्यरत असून २ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णालयास अत्याधुनिक आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यासोबतच येथे मनुष्यबळ पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

ग्रा.रु. चिखली येथील एकूण २८ पदांपैकी २४ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत. याव्यतिरिक्त राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पद्धतीने १६ पदे भरण्यात आली असून आयुष कार्यक्रमांतर्गत ३ वैद्यकीय अधिका-यांची पदे भरली आहेत.

आयपीएचएस अंतर्गत औषधनिर्माता १ पद, अधिपरिचारीका ३ पदे व स्त्रीरोग तज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(३) ग्रामीण रूग्णालय, चिखली चे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये दि. १७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी इमारतीचे अंदाज आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या प्राथमिक आरोग्य सेवेत सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(७) ४३४९८ (१२-०५-२०१६). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी (जि.नाशिक) तालुक्यातील दोन ग्रामीण रुग्णालयाच्या व प्राथमिक आरोग्य सेवेत सोयी-सुविधांची अभाव असून प्राथमिक आरोग्य केंद्रात असणाऱ्या अपुऱ्या सोयी-सुविधा, अस्वच्छता, अपूरा कर्मचारी वर्ग यामुळे आदिवासी रुग्णांची गैरसोय होत असल्याने येथील रुग्णांना आरोग्य सेवेचा लाभ मिळण्यास अनेक अडचणी निर्माण हात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील आदिवासीना वेळेवर उपचार मिळण्याबाबत येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची पूर्तता व आवश्यक तया सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) इगतपुरी (जि.नाशिक) या तालुक्यात एकूण ८ पैकी ५ आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रे व २ ग्रामीण रूग्णालये आहेत. या सर्व ठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांच्या जागा भरलेल्या आहेत. बाहयरुग्ण विभागाद्वारे रुग्णांवर उपचार केले जातात. आंतररुग्ण विभागात अत्यावश्यक सेवा दिल्या जातात. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे कामकाज सुरळीत सुरु आहे. सर्व उपकरणे चालू स्थितीत आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज स्वच्छता केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील दुरावस्थेबाबत

**(८) ४४९६६ (१२-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मराठवाड्यातील बीड, लातूर, उस्मानाबाद व औरंगाबाद जिल्ह्यातील बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्रे अत्यंत जुनाट अवस्थेत, सद्यस्थितीत या केंद्रात किमान सोयी सुविधा आणि पाण्याचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्रामध्ये साथीचे रोग रोखण्यासाठी, पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक असलेली पुरेशी औषधे देखील उपलब्ध नाहीत तसेच पुरेशा संख्येने कर्मचारी वर्ग देखील उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था दूर करण्यासह कर्मचारी वर्गाची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

बीड जिल्हयातील ५० प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ४७ प्राथमिक आरोग्य केंद्र स्वत:च्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांची बांधकामे पुर्ण झाली असून नवीन इमारतीमध्ये कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. एक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही. काही प्राथमिक आरोग्य केंद्रात बोअरचा अपुरा पाणीपुरवठा आहे. तथापि, पाण्याचा अभाव असल्याची गंभीर बाब नाही. २६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीची कामे डीपीडीसी अनुदानातून करण्याचे प्रस्तावित आहे.

लातूर जिल्हयातील ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे स्वत:च्या इमारतीत कार्यरत असून प्राथमिक आरोग्य केंद्र जवळगाच्या पुनर्बांधणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानातून निधी मंजूर होऊन बांधकामाची कार्यवाही सुरु आहे. १६ प्राथमिक आरोग्य केंद्रांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

उस्मानाबाद जिल्हयातील सर्व ४३ प्राथमिक आरोग्य केंद्रे सुस्थितीत आहेत. १२ प्राथमिक आरोग्य केंद्रांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

औरंगाबाद जिल्ह्यात ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे असून त्यापैकी ५ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३ प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरुस्तीची कामे पुर्ण झाली आहेत. दोन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दुरुस्तीचे काम प्रस्तावित आहे. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात पाणी पुरवठयाची सोय आहे.

मराठवाडयातील बीड, लातूर, उस्मानाबाद व औरंगाबाद जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राना साथीचे रोग रोखण्यासाठी औषधाचा पुरेसा साठा आहे. सदरहू ४ जिल्हयातील रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| जिल्हा | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बीड | ६९५ | ४७९ | २१६ |
| लातूर | १०४६ | ७६५ | २८६ |
| उस्मानाबाद | ९६६ | ६५८ | ३०८ |
| औरंगाबाद | १०८८ | ७५३ | ३३५ |

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उमरखेड (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालयात उपजिल्हा रुग्णालयातील सोयी सुविधाच्या अभावाबाबत

**(९) ५१८३३ (१३-०५-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाच्या बृहत आराखड्यामध्ये दर्जा प्राप्त झाला असुन अद्यापपर्यंत बांधकाम सुरु झाले नसुन ग्रामीण रुग्णालय ब्रिटीशकालीन असल्याने व अपुऱ्या कर्मचारी वर्गाच्या सेवेमुळे रुग्णाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये तांत्रिक व भौतिक सुविधा कमी असल्याने रुग्णाची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

उमरखेड येथील ग्रामीण रूग्णालयास उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला असून उपजिल्हा रूग्णालयासाठीच्या वाढीव इमारतीचे बांधकाम प्लिंथ लेव्हल पर्यंत झालेले असून प्रगतीपथावर आहे.

ग्रामीण रूग्णालय, उमरखेड येथील रूग्णालयाचे कामकाज नियमितपणे सुरू असून रूग्णांना आरोग्य सेवा पुरविल्या जातात.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अर्धापूर (जि.नांदेड) शहरातील ग्रामीण रुग्णालयाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ६८१४० (२७-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) शहरातील ग्रामीण रुग्णालयाचे काम गेल्या दोन वर्षापासून बंद असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्तीअभावी मालेगाव येथील बांधकाम पूर्ण झाल्याने ट्रामा केअर सेंटर वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अर्धापूर शहरातील ग्रामीण रूग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मालेगाव येथील ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, अर्धापूर च्या इमारतीचे बांधकाम शेवटच्या टप्प्यात आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मालेगांव येथील स्वतंत्र ट्रामा केअर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून इमारतीचा ताबा दि.१७.११.२०१८ रोजी घेण्यात आला आहे. ट्रामा केअर युनिट, मालेगांव हे कोणत्याही उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयाशी संलग्न नाही. ट्रामा केअर युनिट मालेगाव, कार्यान्वित करण्याकरिता प्रमाणकानुसार ३५ उपकरणांची आवश्यकता असून त्यापैकी १२ उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. उर्वरित यंत्रसामुग्रीसाठी हाफकिन जीव औषध महामंडळ, मुंबई येथे मागणी नोंदविण्यांत आली असून त्यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे. ट्रामा केअर सेंटर मालेगांव करिता ९ पदे मंजूर करण्यात आलेली असून सर्व ९ पदे भरण्यात आलेली आहेत. ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित नसल्यामुळे सदर ९ पदांवर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा जिल्हा रुग्णालय नांदेड येथे उपलब्ध करुन घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिकलसेलग्रस्त रुग्णांना एसटीच्या मोफत प्रवासाच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याबाबत**

**(११) ६९२६३ (२७-०१-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागांना परिवहन विभागाच्या खात्यात १ कोटी रुपयाचा निधी जमा केला नसल्यामुळे सिकलसेलग्रस्त रुग्णांना एसटीच्या मोफत प्रवासाच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सिकलसेलग्रस्त रुग्णांना औषधोपचारासाठी रुग्णालयात जाता यावे याकरिता राज्य शासनाद्वारे मोफत प्रवासाचे परिपत्रक काढण्यात आले असून त्यासाठी १५ कोटी १० लक्ष रुपयाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मोफत प्रवास योजनेचा लाभ सिकलसेलग्रस्तांना घेता यावा त्याकरिता राज्य शासनाने हा निधी सार्वजनिक न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व आदिवासी विकास विभागाकडे दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निधीपैकी एक कोटी रुपयाचा निधी राज्य परिवहन मंडळानी आपल्या खात्यात सार्वजनिक आरोग्य विभागाला जमा करण्यास सांगितले परंतु अद्यापपर्यंत तो निधी देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सिकलसेग्रस्त रुग्णांच्या मोफत प्रवासाचा निधी अद्यापपर्यंत राज्य परिवहन मंडळाच्या खात्यात जमा न करण्यास विलंब करणाऱ्या सार्वजनिक न्याय विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सिकलसेल रुग्ण व त्याच्या एका मदतनीसास उपचारा दरम्यान मोफत प्रवास सवलत देण्यासाठी रु.१,४२,९७,०००/- अनुदानाची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार शासन निर्णय क्र. PHD ३००११/ प्र.क्र. २९७/ २०१६/ आरोग्य-७, दिनांक ३१ मार्च, २०१६ पारित करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

रु.१५.११ कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय, क्र.साआवि-३००११/प्र.क्र.८३३/ २०१५/ आ-७, दिनांक ११ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयाद्वारे रु.३७,६६,७००/- अनुदान महाव्यवस्थापक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई यांच्या बॅंक खात्यात दिनांक ०४.०२.२०१७ रोजी वर्ग करण्यात आले आहे.

एकूण रु.२७८.९८ लक्ष अनुदान महाव्यवस्थापक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, मुंबई यांच्या बॅंक खात्यात दि.१६.०६.२०१७ रोजी वर्ग करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे येथील जिल्हा रुग्णालय व महिला रुग्णालयाच्या मंजूरीबाबत

**(१२) ७४३७६ (१८-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जुन्या जिल्हा रुग्णालयाच्या जागेवर १०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व १०० खाटांचे महिला रुग्णालय मंजूर करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी वर्ग एक ते चारच्या पदांसह बाहयस्तरीय पद गृहीत धरुन ३०७ पदांची निर्मिती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालय व पदनिर्मिती प्रत्यक्षात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

धुळे येथे दि. १७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये १०० खाटांचे जिल्हा रूग्णालय आणि १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रूग्णालय मंजूर करण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) धुळे येथील १०० खाटांच्या जिल्हा रूग्णालयाकरीता गट अ ते गट क ची नियमित १३७ पदे, ७३ बाह्यस्तरीय पदे तसेच महिला व नवजात शिशु रूग्णालय, धुळे करीता गट अ ते गट क ची नियमित ६८ पदे, २९ बाह्यस्तरीय पदे अशा एकूण ३०७ पदांची निर्मिती दि.०२.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सदर पदे भरण्याची आणि रूग्णालयास आवश्यकतेनुसार उपकरणे, यंत्रसामुग्री व औषधांचा पुरवठा करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात राष्ट्रीय अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत

**(१३) ७८११७ (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:

(१) राज्यात विशेषतः कोल्हापूर, लातूर, ठाणे आणि पालघर येथील राष्ट्रीय अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, महिला व बालविकास मंत्री यांचेकडे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी कर्मचारी महासंघ यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी मनुष्यबळास कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्याबाबत केंद्र शासनाच्या कोणत्याही मार्गदर्शक सूचना नाहीत. तथापि, सदर कर्मचाऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने मा.मंत्री, वित्त, मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व मा.मंत्री, ग्रामविकास यांची त्रिसदस्यीय अभ्यास समिती शासन निर्णय दि.०८/०५/२०१८ अन्वये स्थापन केली आहे. सदर समितीच्या दि.१८/०५/२०१८ व दि.१९/१२/२०१८ रोजी बैठका संपन्न झाल्या. बैठकीतील चर्चेनूसार प्रस्तुत प्रकरणी नियमानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**वाशिम येथील सामान्य रुग्णालयामधील कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्स यांच्या निवासस्थानाबाबत**

**(१४) ८१५९९ (१८-०४-२०१७). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम येथील सामान्य रुग्णालयामधील कर्मचारी व वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्स यांची निवासस्थाने बनवून सुमारे ४ वर्षांचा कालावधी झाला तरी अद्याप कोणीही या निवासस्थान मध्ये राहण्यासाठी गेले नसल्यामुळे सदर निवासस्थान पडीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम पूर्ण होऊनी या निवासस्थानमध्ये कर्मचारी राहण्यासाठी न गेल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

सन २०१७ मध्ये वाशिम सामान्य रूग्णालयामधील अधिकारी व कर्मचारी निवासस्थानांमध्ये पाणी पुरवठा व वीज पुरवठा नसल्यामुळे कर्मचारी व अधिकारी यांना निवासस्थानांचे वाटप करण्यात आले नव्हते. सन २०१८ मध्ये पाणी व वीज पुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली असल्यामुळे उपलब्ध असलेली टाईप ४ ची २ निवासस्थाने व टाईप ३ ची ६ निवासस्थाने अशी एकूण ८ निवासस्थानांचे वाटप करण्यात आले असून त्यात कर्मचारी राहत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यातील रुग्णालयात सोनोग्राफी मशीन, सिटी स्कॅन मशीन्स व रक्त पेढीतील रक्त विघटन मशीन बंद असल्याबाबत**

**(१५) ८७४१५ (१२-०८-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, अंबाजोगाई व बीड (जि.बीड) तालुक्यातील ग्रामीण भागात ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, ट्रामा केअर युनिट अशा अनेक ठिकाणी सोनोग्राफी मशीन, सिटी स्कॅन मशीन्स व रक्त पेढीतील रक्त विघटन मशीन यासारखे अत्यावश्यक मशीन मागील वर्षापासून बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील रुग्णास अनेक वैद्यकीय उपचारासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय चाचण्या या खाजगी ठिकाणातून करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यातील कार्यान्वित आरोग्य संस्थांपैकी कोणत्याही रुग्णालयांमध्ये सी.टी. स्कॅन मशीन उपलब्ध नाही. तथापि, हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ यांचे दि.२३.१०.२०१८ च्या पुरवठा आदेशान्वये जिल्हा रुग्णालय, बीड करीता नविन सी.टी. स्कॅन मशीनचा पुरवठा करण्यात आलेला आहे. सदरहू नवीन सी.टी. स्कॅन मशीन कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेली तयारी करण्यात येत आहे. जिल्हा रुग्णालय, बीड, उपजिल्हा रुग्णालय, केज येथील सोनोग्राफी मशीन कार्यान्वीत आहेत. कुटीर रुग्णालय, नेकनूर येथील सोनोग्राफी मशीन बंद आहे. ग्रामीण रुग्णालय, धानोरा, ग्रामीण रुग्णालय, नांदूरघाट व कुटीर रुग्णालय, नेकनूर येथे सोनोग्राफी मशीन अनुज्ञेय नाही. केज जिल्हा रुग्णालय, बीड येथे रक्त विघटन केंद्र कार्यान्वित असून सदरच्या रक्त विघटन केंद्रातील उपलब्ध असलेल्या सर्व मशिन्स चालू आहेत. रक्त विघटन केंद्र हे जिल्हा रुग्णालय येथे मंजूर असून ते अन्य रुग्णालयास अनुज्ञेय नाही.

(२) हे खरे नाही.

केज, अंबाजोगाई व बीड तालुक्यातील कार्यान्वित आरोग्य संस्थांमार्फत दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीत एकूण ५,३५,८९८ प्रयोगशाळा चाचण्या करण्यात आल्या असून, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत Outsourcing of laboaratory services च्या प्रकल्पातंर्गत मे. एच.एल.एल. लाईफ केअर लि. यांचेमार्फत दि.०३.०७.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीत एकूण २८,०५२ प्रयोगशाळा चाचण्या करण्यात आल्या आहेत. चाचण्याकरीता रुग्णांकडून शुल्क घेण्यात आले नाही.

(३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील आरोग्य संस्थांमधील बायोमेडिकल उपकरणांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी संस्थानिवडीची प्रक्रिया पूर्ण झालेली असून मे. फेबर सिंडूरी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि., चेन्नई या कंपनीशी करार करण्यात आलेला आहे. सदरहू कराराची अंमलबजावणी दि.०१.१२.२०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वावी (ता.सिन्नर, जि.नाशिक) प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शव विच्छेदन कक्ष सुरु करणे बाबत**

**(१६) ९६५४५ (२७-१२-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त अपघात होत असून नाशिक-शिर्डी महामार्गावरील वावी (ता.सिन्नर, जि.नाशिक) प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शव विच्छेदन कक्ष सुरु करणे बाबत ग्रामस्थांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्र, वावी ता.सिन्नर जिल्हा नाशिक येथे शव विच्छेदन कक्ष अस्तित्वात आहे. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्र वावी येथे एम. बी.बी. एस. वैद्यकीय अधिकारी पद रिक्त असल्यामुळे शव विच्छेदन कक्ष कार्यरत झालेला नाही.
(२) पद भरतीची कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबत**

**(१७) ९९२५१ (०३-०१-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरु करण्याबाबतची मागणी लेखी पत्राद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) ट्रॉमा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून ट्रॉमा केअर युनिट सुरू करण्यासाठी धोरण निश्चित करण्यासाठी दि.२२.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हयात रुग्णवाहिकेअभावी रुग्णाचा झालेला मृत्यू

**(१८) १०५३९६ (०७-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात दिलखूश दिलीप मंडल नावाच्या मुलाला कुत्रा चावल्याने उपचाराकरीता मुंबईत नेण्यासाठी १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका देण्यास डॉक्टरांनी नकार दिल्यामुळे वेळीच उपचार न झाल्याने मुलाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, चौकशी केली आहे.

(३) दोषी वैद्यकीय अधिकारी यांना सेवापुरवठादारामार्फत सेवामुक्त करण्यात आले आहे. तसेच सेवापुरवठादारास समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खाजगी रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी उपचाराचा खर्च जमा न केल्याने रुग्णांना डांबून ठेवण्यात येत असल्याबाबत

**(१९) १०७१०७ (०७-०४-२०१८). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी उपचाराचा खर्च जमा न केल्याने ते जमा होईपर्यंत रुग्णाला डांबून ठेवण्यात येत असल्याचे गंभीर प्रकार होत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णांना अशी वागणूक देणाऱ्या खासगी रुग्णालयांची संख्या किती आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने याची तातडीने दाखल घेऊन रुग्णांचे अधिकार व हक्क यांचा सविस्तर तपशील सरकारी संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार आलेल्या रुग्णालयांवर कोणती प्रशासकीय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०९-२०१९) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

मुंबई येथील सेव्हन हिल्स हॉस्पीटल, अंधेरी या रुग्णालयाविरुध्द तक्रार प्राप्त झाली होती. सदर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात २०१४ मध्ये एक क्रिमिनल जनहित याचिका क्र.४२/२०१४ दाखल आहे.
(२) अशा प्रकारची वागणूक फक्त मुंबईतील एकाच रुगणालयात घडल्याबाबत या विभागात माहिती प्राप्त आहे.
(३) होय हे खरे आहे,

रुग्णांचे अधिकार व हक्क शासनाच्या www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि.१२.०२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.
(४) सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयात जननी सखी योजना कार्यान्वीत करण्याबाबत**

**(२०) ११००६४ (०४-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयात जननी सखी योजना कार्यान्वीत करण्यात यावी अशी मागणी आशा समन्वय समितीने लेखी निवेदनाव्दारे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात ५० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात अतिदक्षता विभागासह दर्जोन्नती देण्याबाबत**

**(२१) ११२१२४ (०१-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात ५० खाटांच्या रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात अतिदक्षता विभागासह दर्जोन्नती देण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी विनंती पत्र देवूनही अदयाप त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त रुग्णालयात उपचाराची चांगली यंत्रणा असतानाही येथील वैदयकिय अधिक्षक डॉ.राजेश मोरे यांच्या भोंगळ कारभारामुळे रुग्णांना योग्य रुग्णसेवा देता येत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील वैद्यकिय अधिक्षकांवर कारवाई करण्याबाबत तसेच रुग्णालयाला दर्जोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधीनी भोर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटांवरुन १०० खाटांत श्रेणीवर्धन करण्याबाबत विनंती केली आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

डॉ. राजेश मोरे यांच्या बाबत स्थानिक जनतेच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे त्यांचे कडील वैद्यकीय अधिक्षक या पदाचा कार्यभार काढुन घेण्यात येवून त्यांच्या सेवा जिल्हा रुग्णालय, पुणे येथे अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत. उपजिल्हा रुग्णालय भोर येथील रुग्णसेवा सुरळीतपणे सुरु आहे.

डॉ.मोरे, वैद्यकीय अधिक्षक यांच्या विरुध्द गैरकारभाराबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने स्थानिक स्तारावर चौकशी समिती नेमण्यात आली होती, सदर चौकशीच्या अहवालानुसार दि. ३१/५/२०१८ रोजी प्रशासकिय कारणास्तव उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर येथे बदली करण्यात आलेली आहे.

सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारावर रुग्णालयाची स्थापना व श्रेणीवर्धन करण्याबाबतचा जोड बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून भोर उपजिल्हा रुग्णालयाचे ५० खाटांवरुन १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी जोड बृहत आराखडया मध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बार्शिटाकळी (जि.अकोला) तालुक्यातील शेतकऱ्यांनी मायक्रो फायनान्स कंपनीकडून घेतलेल्या कर्जाबाबत**

**(२२) ११४३९४ (२४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले असून या तालुक्यातील चोहोगांव येथील श्री.हरीदास पिंगळे या शेतकऱ्याने कंपनीचे कर्ज फेडू शकत नसल्यामुळे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने शासनाने आत्महत्याग्रस्त शेतक-याच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०९-२०१९) :** (१) नाही.

अकोला जिल्हयातील बार्शिटाकळीअंतर्गत असलेल्या मौजे चोहोगांव येथील मृतक श्री.हरिदास रतन इंगळे, वय ५० वर्षे यांनी दिनांक ३१/०१/२०१८ रोजी आत्महत्या केली. परंतु मृतकाचे नांवे शेती नसून त्यांच्या पत्नीच्या नांवे ००.४० आर शेती असून मृतकाच्या पत्नीच्या नावे सेवा सहकारी संस्था लि.चोहोगांव यांचे दिनांक ३०/०७/२०१६ चे रुपांतरण असलेले कर्ज रु.१४,८७८/- इतके श्री छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कर्जमाफी योजना, २०१७ अंतर्गत त्यांना कर्जमाफी मिळाली आहे. परंतु सदर प्रकरणातील मृतकाचे पत्नीच्या म्हणण्यानुसार व तलाठी, मंडळ अधिकारी यांचे अहवालानुसार मृतकावर (लक्ष्मी रामदास खंडारे यांचे रु.८०,०००/- व विजय संपत कपले यांचे रु.१०,०००/-) खाजगी कर्ज होते. व तालुका कृषी अधिकारी यांचे अहवालानुसार सदर आत्महत्या ही नापिकी झाली असल्याने सदर प्रकरण कर्जबाजारीपणा व नापिकीमुळे मदतीस पात्र ठरली आहे.

(२) सदर प्रकरणातील चौकशी अहवालानुसार कोणत्याही मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आले नाही. सदर कर्ज खाजगी व्यक्तीकडून घेतले असल्याने सदर प्रकरण कर्जबाजारीपणा व नापिकीमुळे मदतीस पात्र ठरले आहे. परंतु सदर प्रकरणात मृतकाला दोन पत्नी, चार मुले व तीन मुली असल्याचे निदर्शनास येत असल्याने सदर प्रकरणात आर्थिक मदत वितरीत करण्यासाठी वारस असल्याबाबत सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. परंतु सदर वारसांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र अद्याप सादर न केल्यामुळे मदतीची कार्यवाही प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी मनोविकार व मानसोपचार**
**तज्ञ डॉक्टरांची पदे मंजूर करण्याबाबत**

**(२३) ११६७२२ (२८-०७-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राबविण्यात आलेल्या प्रेरणा प्रकल्पांतर्गत नैराश्यग्रस्त शेतकरी व त्यांच्या कुंटूबियांना मानसोपचार तज्ञाची व्यवस्था करण्यात आली परंतु यासाठी पुरेसे मानसोपचारतज्ञ व कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे प्रेरणा प्रकल्पाचे काम साध्य झाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य शासनाने इतर अनेक योजना जाहिर करुनही आत्महत्यांचे सत्र सुरुच असल्याने यास जाहिर केलेल्या योजनांमधील गैरव्यवहार व त्रुटी प्रामुख्याने कारणीभूत असल्याने आरोग्य विभागामार्फत शेतक-यांवर मानसोपचार करण्यासाठी मनोविकार व मानसोपचार तज्ञ डॉक्टरांची किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,

(३) असल्यास, सदर मंजूर पदापैकी जवळपास ४० टक्क्याहून अधिक मनोविकार व मानसोपचार तज्ञांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नैराश्यग्रस्त शेतक-यांचा शोध शास्त्रोक्त पध्दतीने घेण्यासाठी तसेच उपचाराचे व उपचारानंतरचे वर्गीकरण करण्याची यंत्रणा नसल्यामुळे शासनाने प्रेरणा प्रकल्पांचा आढावा घेऊन राज्यात प्रेरणा प्रकल्प सक्षमपणे राबवून राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासह मनोविकार व मानसोपचार तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबतत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मानसोपचारतज्ञांची एकूण १४ पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरलेली आहेत. उर्वरित तीन ठिकाणी कंत्राटी तत्वावर मानसोपचार तज्ञ उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. यवतमाळ येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मानसोपचार तज्ञाकडून सेवा देण्यात येतात.

(४) नैराश्यग्रस्त शेतकयाचा शोध शास्त्रोक्त पध्दतीने घेवून त्यांचे वर्गीकरण करण्याची यंत्रणा स्थापन करण्यात आली असून,या यंत्रणामार्फत नैराश्यग्रस्त शेतकयाचा शोध घेण्यात येवून आवश्यकतेनुसार समुपदेशन उपचार करण्यात येतात. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**स्व.इंदिरा गांधी मेमोरियल उपजिल्हा रुग्णालय (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे रुग्णाची होत असलेली गैरसोय**

**(२४) ११६८३२ (०६-०८-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व. इंदिरा गांधी मेमोरियल उपजिल्हा रुग्णालय (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे रुग्णांना उपचारास लागणाऱ्या गरजेच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये गरजेच्या असणाऱ्या सर्व सोयी-सुविधा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक, सेवाभावी संस्था व सामाजिक संघटना यांच्यातर्फे वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केंली आहे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णलयातील होणारे गैरप्रकार रोखण्यासह रुग्णांना उपचारासाठी लागणाऱ्या गरजेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

भिवंडी जिल्हा शहर महिला कॉंग्रेस कमिटी अध्यक्षा यांनी दि. १४/५/२०१८ रोजी रुग्णालयातील अपु-या सोयी सुविधाबाबत निवेदन सादर केले असून या अनुषंगाने स्थानिक वर्तमान पत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) हे रुग्णालय १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असून उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रमाणकानुसार सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

सुधारीत बृहत आराखडयानुसार या रुग्णायाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे २०० खाटांच्या सामान्य रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्याने २०० खाटांच्या प्रमाणकानुसार, इमारतीच्या दुरुस्ती बाबत व अतिरिक्त कर्मचारी मंजूर करणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हा शासकिय रुग्णालयात रुग्णवाहिका अभावी रुग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२५) १२०१८६ (२५-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरगांव (ता.शेनगांव, जि.हिंगोली)येथील दुर्गम भागातील श्रीमती कल्पना मार्कंड या महिलेच्या नवजात बालकाला तिच्या घरी घेऊन जाण्यासाठी १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका

जिल्हा शासकिय रुग्णालयाच्या प्रशासनाने उपलब्ध करुन न दिल्याने बालकासह सदर महिलेच्या जिवाला धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील रुग्णालयात १०२ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याची बाब संबंधित अधिका-यांना वारंवार लक्षात आणून देऊनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हा शासकीय रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध करुन न देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह या रुग्णालयात ग्रामीण भागातील रुग्णांचे रुग्णवाहिका अभावी होणारी गैरसोय थांबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

हिंगोली जिल्हयातील प्रत्येक रुग्णालयामध्ये टोल फ्री क्र.१०२ ची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) व (४) श्रीमती कल्पना मार्कंड ही गरोदर माता प्रसुतीसाठी दि.१८.०२.२०१८ रोजी जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथे अंतररुग्ण म्हणून भरती झाली होती. दि.१८.०२.२०१८ रोजी प्रसुती झाल्यानंतर सदर महिलेस योग्य ते उपचार करुन दि.२१.०२.२०१८ रोजी रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली व त्याच दिवशी तिच्या नवजात बाळासह निवासस्थानी डोंगरगाव येथे टोल फ्री क्र.१०२ च्या रुग्णवाहीकेने सुखरुप पोहोचविले होते. सदर महिलेची या संदर्भात कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील शासकीय रुग्णालयात उष्मा संबंधित आजाराच्या रुग्णांची नोंदी नसल्याबाबत

**(२६) १२०६२५ (०१-०८-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील शासकिय रुग्णालयात ऊष्माघाताच्या रुग्णांच्या नोंदी शुन्य असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेयो रुग्णालयात स्वतंत्र कक्ष ऊष्माघाताच्या रुग्णाकरीता तयार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगर पालिकेने सदर रुग्णांच्या नोंदी छापील नमुन्यात माहिती उपलब्ध होणेकरीता वितरीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आरोग्य मंत्रालयाच्या दिनांक १५ मार्च च्या परिपत्रकास शासकीय रुग्णालयातील संबंधीत अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

दि.१५ मार्च ते २४ जून २०१८ या कालावधीत नागपूर शहरात ३६४ तर नागपूर जिल्ह्यात (ग्रामीण) ३२ उष्मा संबंधित आजाराच्या रुग्णांची नोंद झालेली आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांची झालेली दुरावस्था

**(२७) १२९०८२ (११-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात आदिवासी भागातून गोरगरीब रूग्ण कमी खर्चात उपचार मिळण्याच्या उद्देशाने येत असून तेथे कायमस्वरूपी डॉक्टर नसल्याने तेथे येणा-या गोरगरीब रूग्णांना औषधोपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी तसेच अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे मागील काही वर्षांपासून रिक्त असल्याने सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत असल्याने तेथे येणारे रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून कर्मचा-यांना वाईट वागणूकही दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्राच्या नुतनिकरणासाठी २३ लाखांचा निधी खर्च केलेला असतानाही अपुऱ्या कर्मचारीवर्गामुळे रूग्णांची गैरसोय तसेच सफाई कामगारांअभावी रुग्णालयात अस्वच्छता दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आरोग्य केंद्राची झालेली दुरावस्था व रिक्त पदामुळे तेथील कर्मचा-यावर पडणारा अतिरीक्त ताण कमी करण्यासह रूग्णांची होत असलेली गैरसोय विनाविलंब दूर करून रूग्णांना चांगल्या व नियमितपणे आरोग्य सोयीसुविधा मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, नेरळ येथील दोन्ही नियमित वैद्यकीय अधिकायांची पदे रिक्त आहेत.परंतु सद्दस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र, कडाव ता.कर्जत व आंबिवली ता.कर्जत येथील वैद्यकीय अधिकारी यांना नेरळ येथील कामकाज पाहण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

नेरळ विकास संकुल प्राधिकरण विकास कामे या योजनेंतर्गत सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची सन २०१५-२०१६ मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. कर्मचा-यांच्या १३ पदांपैकी १२ पदे भरलेली असून सफाई कर्मचायांचे पद कंत्राटी तत्वावर भरलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खालापूर (जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचारी वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(२८) १२९२०६ (१०-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे रुग्णांवर उपचार करण्यासाठी २४ तास सुरू असून तेथे बाहय रूग्ण तपासणीचे दररोज सुमारे १५० च्या वर रूग्ण औषधोपचारासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्राजवळ असलेल्या वैद्यकीय अधिकारी व अन्य कर्मचारी यांच्या निवासस्थानांची दुरावस्था झालेली असून इमारतींवर वाढलेले गवत, शौचालयाची झाकणाविना टाकी व मृत व्यक्तींच्या कपडयांचा खच आदी बाबी निदर्शनास येत असल्यामुळे तेथे रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील इमारती व परिसराची देखभाल आजमितीस न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदरहू आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्य इमारती विनाविलंब दुरूस्ती करण्यासंदर्भात व तेथील परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या वर्षात देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

(४) सन २०१५-२०१६ मध्ये कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती कामे व २०१६-२०१७ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आवारातील पेव्हरब्लॉक इ. कामे करण्यात आली आहेत.

(५) पश्न उद्‌भवत नाही.

---

### आग्रीपाडा, मुंबई येथील वोखार्ट रुग्णालयामधील गैरकारभार

**(२९) १३१५०१ (११-१२-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आग्रीपाडा, मुंबई येथील वोखार्ट रुग्णलयामध्ये रुग्णाकडून उपचारासाठी, वैद्यकीय चाचणी, डॉक्टर व्हीजीट फी इत्यादीसाठी रुग्णालय प्रशासन अवाजवी शुल्क आकारत असल्याने त्याविरोधात रुग्णांच्या नातेवाईकांनी असंख्य तक्रारी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनोक १४ मे, २०१८ रोजी वोखार्ट रुग्णालयाच्या इमारती बाहेरील बाजूस बेस्ट जंक्शन बॉक्समध्ये लागलेल्या आगीमुळे आजूबाजूच्या इमारतींना नुकसान पोहचण्याची शक्यता असल्याने याबाबत परिसरातील रहिवाशांनी वोखार्ट रुग्णालय प्रशासनाला आग विझवणाऱ्या यंत्रणे बाबत विचारले असता रुग्णालय प्रशासनाने याबाबत माहिती देण्यास दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वोखार्ट रुग्णालय प्रशासन गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय लाभ देणे, बृहन्मुंबई महानगरपानिका नियमानुसार २०% खाटा गरिबांसाठी राखीव ठेवणे त्याचबरोबर राजीव गांधी योजनेचा लाभ देणे याकडे देखील दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वोखार्ट रुग्णालयामधील गैरकारभारासंदर्भात रुग्णालय प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत दि. २९ जून, २०१८ मध्ये अतिरिक्त रक्कमेची मागणी केल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्या तक्रारीच्या अनुषंगाने रुग्णालयाविरुध्द तक्रारीची नोंदणी करण्यात आली होती. वरील तक्रारीचे निराकरण झाले असून रुग्णांना अतिरिक्त रक्कम परत दिली गेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन मशिन बंद असल्याबाबत**

**(३०) १३१८०४ (११-१२-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील जिल्हा शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन मागील एक ते दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशीन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथील सी.टी. मशिन दि. २८.११.२०१४ रोजी उपजिल्हा रुग्णालय कळवण येथे स्थलांतरीत करण्यात आली आहे.

(२) सन २०१६-१७ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्राप्त निधीतून दि. १६.०४.२०१४ रोजी सी.टी.स्कॅन मशिन जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून बी.पी.एल धारक रुग्णांचे व तातडीचे सी.टी.स्कॅन हे खाजगी व्यावसायिकांमार्फत काढण्यात येत होते. याबाबतचा खर्च रुग्ण कल्याण समितीतून भागविण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कामखेडा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील शेत व पाणंद रस्त्यांच्या कामास मंजुरी देण्याबाबत**

**(३१) १३४७७४ (०४-०६-२०१९). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कामखेडा (ता.रेणापूर,जि.लातूर) येथील शेत व पाणंद रस्ते मजबुतीकरण पालकमंत्री शेत/पाणंद रस्ता योजनेंतर्गत सदर कामांना मंजुरी देण्ण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधीनी उपविभागीय अधिकारी रेणापूर-औसा यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने उक्त गावातील रस्त्यांच्या कामास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदरील कामांना जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने दिनांक ३१.१२.२०१८ रोजीचे बैठकीत मंजुरी देण्यात आलेली आहे.

---

**लोणी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) परिसरामध्ये वादळ वाऱ्यामुळे फळबागांचे झालेले नुकसान**

**(३२) १३४८६७ (१५-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) परिसरामध्ये दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास दुपारी ३ वाजता वादळी वारे आले असुन सदर वादळी वाऱ्यामुळे सुमारे ६२ हेक्टरवरील फळबागांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचा पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याबाबतचे निवेदन स्थानिकांनी तहसिलदार, परांडा यांना देवुनही पंचनामे झाले नाही किंवा नुकसान भरपाई मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व बाबी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांचेकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषगांने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-१०-२०१९) :** (१) लोणी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) परिसरामध्ये दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास दुपारी ३ वाजता झालेल्या वादळी वाऱ्यामुळे फळबागांचे ३३ टक्क्यांच्यावर नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(४) लोणी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) परिसरामध्ये दिनांक ४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास दुपारी ३ वाजता झालेल्या वादळी वाऱ्यामुळे फळबागांचे ३३ टक्क्यांच्यावर नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. सबब, शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार नुकसानभरपाई अनुज्ञेय नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धरणांच्या दुरुस्त्यांसाठी जागतिक बँकेने निधी देण्यास दिलेली मंजुरी**

**(३३) १३५०१८ (०५-०७-२०१९). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या धरण पुनर्वसन व सुधारणा प्रकल्पांतर्गत राज्यातील धरणांच्या दुरुस्त्यांसाठी जागतिक बँकेने ९६० कोटी रुपयांचा निधी देण्यास मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतून राज्यातील कोणकोणत्या धरणांची दुरुस्ती करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या धरणांच्या दुरुस्तीच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) :** (१) होय.

केंद्र शासनाने DRIP टप्पा-२ व टप्पा -३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील धरणांकरीता एकूण रु.९४० कोटी मंजूर असल्याचे दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) DRIP टप्पा-२ व टप्पा -३ अंतर्गत मंजूर निधीच्या मर्यादेत प्रस्तावित करावयाच्या धरणांची संख्या व नावे निश्चित करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) सदर DRIP-II कार्यक्रमाचा कालावधी एप्रिल २०२० ते २०३० असा १० वर्ष आहे. त्यातील नियोजनानुसार कामे करणेत येतील.

---

## राज्यातील वन क्षेत्रात होत असलेली घट

**(३४) १३५४६० (१२-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वृक्षलागवडीचे कार्यक्रम मोठया प्रमाणात करण्यात आले असले तरीही गेले तीन वर्षात ६३३ चौ. कि.मी. वनक्षेत्र कमी झाल्याचे तसेच गेले तीन दशकात सुमारे १६०२ चौ. कि.मी. इतके जंगल क्षेत्र कमी झाले असल्याचे सन २०१७-१८ च्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये सादर झालेल्या आर्थिक पाहाणी अहवालामध्ये निदर्शनास झाले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, वनक्षेत्राची ही घट वनखाते आणि फॉरेस्ट डेव्हलमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्राच्या यांच्या अखत्यारीतील असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय वनधोरण मानकानुसार राज्याचे एकूण किती टक्के क्षेत्र वनाखाली असल्याचे निदर्शनास झाले आहे तसेच राष्ट्रीय वनधोरण १९८५ नुसार एकूण क्षेत्रफळाच्या ३३ टक्के क्षेत्र वनाखाली असणे आवश्यक असताना राज्यातील वनक्षेत्र वाढण्या ऐवजी कमी होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील वनक्षेत्रात वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१०-२०१९)** : (१) सन २०१७-१८ अंतरिम बजेट मध्ये सादर झालेल्या आर्थिक पाहाणी अहवालामध्ये मागील १० वर्षात ८८.०० चौ.कि.मी. वनक्षेत्र कमी झाल्याचे दिसून येत आहे.

परंतु, सन २०१६-१७ मध्ये ६१७२४ चौ.कि.मी. असणारे क्षेत्र सन २०१७-१८ मध्ये ६१८५१ चौ.कि.मी. झाले आहे. म्हणजे मागील २ वर्षात वन क्षेत्रात घट न होत उलट १२७ चौ.कि.मी. क्षेत्राची वाढ झाली आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय वन निती, १९८८ नुसार राज्यात ३३ टक्के क्षेत्र हे वनाखाली असणे आवश्यक आहे. मागील १० वर्षात ८८.२० चौ.कि.मी. वनक्षेत्र कमी झाल्याचे दिसून येत आहे.

परंतु वार्षिक प्रशासन अहवालानुसार सन २०१५-१८ मध्ये म्हणजे मागील तीन वर्षात राज्यातील वन क्षेत्रात घट न होता उलट २२८.३७ चौ.कि.मी. एवढी वाढ झालेली आहे. तसेय भारतीय वन सर्व्हेक्षण संस्था यांनी प्रकाशित केलेल्या सन २०१३ ते २०१७ या कालावधीतील अहवालानुसार राज्यातील वनक्षेत्रात २२२ चौ.कि.मी. वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

तथापि, राज्यातील वन क्षेत्र जवळपास २०.१० टक्के एवढे कायत आहे.

(४) राज्यातील वनक्षेत्रात वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने सन २०१७ ते २०१९ या वर्षामध्ये दरवर्षी जून-जुलै महिन्यात वृक्ष लागवड करुन एकूण ५० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट ठेवले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कोतवालांच्या विविध मागण्यांबाबत**

**(३५) १३६२०८ (०५-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यासह राज्यातील कोतवालांनी चतुर्थ श्रेणी मिळण्याबाबत व इतर न्याय मागण्यांसाठी माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलने केली असुन कोतवालांच्या विधवांना किमान ३ हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याबाबत मागणी महाराष्ट्र राज्य कोतवाल संयुक्त संघर्ष समितीने दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी आझाद मैदानावर मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १२ हजार ६२७ कोतवालांनी बेमुदत काम बंद आदोलन सुरु केल्यामुळे चावडीतली अनेक कामे ठप्प झाली असून त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच कोतवालांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार कोतवालांना चतुर्थ श्रेणी देण्यासह त्यांच्या इतर न्याय मागण्या मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-१०-२०१९) :** (१) महाराष्ट्र राज्य कोतवाल संयुक्त संघर्ष समितीने त्यांचे मागण्याबाबत मा.मुख्यमंत्री सचिवालयास दि. २६ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे निवेदन सादर केलेले आहे.
(२) कोतवालांच्या कामबंद आंदोलनामुळे काही प्रमाणात तलाठी व मंडळ अधिकारी यांना गैरसोय निर्माण झाली होती.
(३) कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा देणे, पात्र कोतवाल कर्मचाऱ्यांना ज्येष्ठतेनुसार शिपाई संवर्गात पदोन्नती देणे, मानधनामध्ये वाढ करणे इत्यादी मागण्या संघटनेने केलेल्या आहेत.
(४) "कोतवाल" हे पद मानधनावरील आहे. सबब कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

राज्यातील अशा मानधनावरील कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता राज्य शासनाने "एकछत्र योजना" तयार करण्यासाठी समिती स्थापन केली होती. सदर समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दि.०६.०२.२०१९ व शुध्दिपत्रक दि.०१.०३.२०१९ नुसार कोतवालांच्या मानधनात सेवाकालावधीनुसार भरीव वाढ करण्यात आलेली आहे. महसूल विभागांतर्गत असणाऱ्या गट 'ड' च्या प्रथम नियुक्ती पदांपैकी नियमित पदांमधून ४० % पदे कोतवालांसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत. तसेच "राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ त्या त्या योजनांमधील अटींनुसार देण्यात येऊन त्याकरिता येणारे हप्ते राज्य शासनाकडून भरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोयना धरणाच्या जलनीतीत बदल करण्याचा निर्णय घेऊन समिती गठीत केल्याबाबत

**(३६) १३६२२६ (१०-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणाच्या जलनीतीत बदल करण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी शासनाने समिती गठीत केली असल्याचे माहे मार्च २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजनिर्मिती झाल्यानंतर समुद्रामार्गे वाया जाणारे कोयना धरणाचे पाणी कृष्णा खोऱ्यात देण्यात येणार असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी व शेती सिंचनासाठी मागणी होत असलेल्या जिल्ह्यांना मुबलक पाणीसाठा उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला आहे काय व प्राप्त अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-१०-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/ (१२६/२०१८)/जसंअ, दि.२.८.२०१८ अन्वये कोयना व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहास कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविणेत येणारे पाणी टप्प्याटप्प्याने कमी करण्याकरीता अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट गठित करणेत आलेला होता.

(२) अंशत: खरे आहे.

राज्य शसनाने शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/(१२६/२०१८)/जसंअ, दि. २ ऑगस्ट, २०१८ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरीता अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट गठित करण्यात आलेला होता व या अभ्यास गटाचा अहवाल दि. १० मे, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. या अभ्यासगटाचा अहवालावरील अभ्यास शासन स्तरावर प्रगतीत आहे.

(३) उपरोक्त अभ्यास गटाचा अहवाल दि. १० मे २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. या अभ्यासगटाच्या अहवालावरील अभ्यास शासन स्तरावर प्रगतीत आहे. तसेच, सदरील अहवालाबाबत कृष्णा पाणी तंटा लवादाचे निर्णय व सर्वोच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ याचिका यांचे अनुषंगाने विधीज्ञ यांचे अभिप्राय व उर्जा विभागाचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील रोजगार सेवकांना मानधन मिळण्याबाबत

**(३७) १३७६३५ (११-०७-२०१९). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील रोजगार सेवकांना मागील सात -आठ महिन्यांपासून मानधन मिळालेले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार सेवकांना आधीच कमी मानधन, त्यात अनेक महिन्यांपासून मानधन मिळालेले नसल्याने शासनाने चौकशी करुन रोजगार सेवकांना देण्यात येणारे मानधन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अचलपूर तालुक्यातील ग्रामपंचायतीमधील रोजगार सेवकांच्या मानधनाचा निधी दि.२९ मे, २०१९ ला पंचायत समिती स्तरावरुन सर्व ग्रामपंचायतींना अदा करण्यात आला.

---

**राजीव गांधी जीवन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कार्डचे वाटप करण्याबाबत**

**(३८) १३८०११ (१२-०७-२०१९). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात गरीब व गरजू लोकांसाठी मोफत आरोग्य सेवा मिळावी म्हणून शासनाने राजीव गांधी जीवन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा लाभ गरीब व गरजू लोकांना मिळावा यासाठी कुटुंबांचे सर्व्हे करून या योजनांचे किती कार्डचे वाटप करण्यात आले आहेत व किती कुटुंब या योजने पासून वंचित आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वंचित असलेल्या गरीब व गरजू कुटूंबाना या योजनेचे कार्ड मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०९-२०१९) :** (१) होय.

सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०११ अन्वये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यात आली होती. सा.आ. वि. शासन निर्णय, दिनांक १३ एप्रिल, २०१७ नुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतील मुळ तरतुदी कायम ठेवून सदर योजना "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या नावाने राबविण्यात येत आहे.

(२) व (३) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या (पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोगय योजना) पहिल्या टप्यात (अमरावती, नांदेड, धुळे, गडचिरोली, रायगड, सोलापुर, मुंबई शहर व मुंबई उपनगर या ०८ जिल्हयांसाठी) एकुण २३,६३,८८० इतक्या आरोग्य ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तर योजनेच्या दुसऱ्या टप्यात उर्वरित जिल्ह्यामध्ये एकुण ७७,४१,२५४ इतक्या कार्डचे (आरोग्य ओळखपत्राचे) वाटप करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ पिवळी, अत्योंदय, अन्नपुर्णा, केशरी शिधापत्रिकाधारक (ज्यांचे उत्पन्न १ लाख रुपयेपर्यंत असलेली) आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्हयातील शुभ्र शिधापत्रिकाधारक यांना आरोग्य ओळखपत्राच्या वा शासनमान्य फोटो ओळखपत्राच्या सहाय्याने योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांत योजनेचा लाभ घेता येतो. या योजनेच्या लाभापासुन कोणीही वंचित राहिले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायगांव (जि.नांदेड) तालुक्यात बेरोजगारांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत कामे सुरु करणेबाबत**

**(३९) १३८८५१ (०५-०७-२०१९). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (जि.नांदेड) तालुक्यात बेरोजगारी वाढल्यामुळे ग्रामरोहयोची कामे सुरु करण्याची बेरोजगारांनी मागणी केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नांदेड जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतंर्गत सन २०१७-१८ पूर्वीचे १८ हजार ४२० कामे अपूर्ण असल्याची माहिती माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मनरेगा अंतर्गत अपूर्ण असलेली कामे वेळेत पुर्ण करण्यासह नायगांव तालुक्यातील बेरोजगारांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत कामे उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर अपूर्ण कामे मार्च, २०२० पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून नायगांव तालुक्यात मजुरांच्या मागणीनुसार कामे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हयात शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत**

**(४०) १३९०२४ (०८-०७-२०१९). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी तयार करुन शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन पालघर जिल्हयात कृषी महाविद्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (०४-०९-२०१९)** :(१) होय.

(२) शासनाने दि. २५.३.२०१४ रोजी नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करण्याचा बृहत आराखडा तयार करताना कोकण कृषि विद्यापीठाकडून प्राप्त प्रस्तुत प्रस्तावाचा विचार करण्याबाबत सूचित केले होते. महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने कृषि परिषदेच्या ९८ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. १९/९७/२०१८ अन्वये डॉ. एस.एस. मगर, माजी कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीने तयार केलेला कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा शासनास सादर केला आहे. सदरचा बृहत आराखडा शासनाच्या विचाराधीन आहे.

तथापि राज्यातील चारही कृषि विद्यापीठांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशी स्वीकारलेल्या आहेत. त्यामुळे पाचव्या अधिष्ठाता समितीच्या निकषांनुसार पालघर येथे कृषि महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने कृषि परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत कृषि परिषद कार्यालयाने दि. ६.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली विद्यापीठास कळविले आहे. सदरचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## बीड जिल्हयात चारा छावण्यात जनावराची बोगस संख्या दाखवून अनुदानात केलेला गैरव्यवहार

**(४१) १३९२७९ (१३-०७-२०१९). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील चारा छावण्यात जनावरांची संख्या बनावट दाखवून अनुदानात गैरव्यवहार करुन बीड तालुक्यातील १६ छावण्या तर आष्टीतील २० छावण्यात तपासल्या असता याठिकाणी ७४४ जनावरे कमी आढळुन आल्याचे दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण ९३१ छावण्यांना मंजूरी देण्यात आली असुन त्यापैकी ६०० छावण्या सुरु आहेत. यामध्ये सर्वाधिक १८६ छावण्या बीड तालुक्यात तर १८५ चारा छावण्या आष्टी तालुक्यात आहेत. बीडच्या छावणीवरील जनावरांची संख्या दिनांक ९ मे, २०१९ रोजी ४,१७,६७१ होती. दुसऱ्या दिवशीच दिनांक १० मे, २०१९ रोजी अचानक केलेल्या तपासणीत छावण्यांतील जनावरांची संख्या १३,३४४ ने कमी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यात चारा छावण्या सुरु करण्यापेक्षा ज्यांच्याकडे जनावरे आहेत त्या शेतकऱ्यांनी जनावरांसाठी आवश्यकते प्रमाणे मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०९-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे कोल्हारवाडा ता.बीड येथील मत्स्यगंधा बहु. सेवाभावी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या चारा छावण्यांची तपासणी केली असता, ७४४ जनावरांची तफावत आढळून आली आहे. सदर चारा छावणीची मान्यता दिनांक १०/०५/२०१९ रोजी रद्द करुन सुरुवातीपासून ७४४ जनावरांचे अनुदान कपात करणे व एकूण देयकाच्या १० टक्के दंडात्मक कारवाईचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

बीड तालुक्यात १८७ चारा छावण्या व आष्टी तालुक्यात १८५ चारा छावण्या सुरु होत्या. ज्या चारा छावण्यामध्ये अचानक जनावरांची संख्या कमी झाली अशा चारा छावण्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच बीड तालुक्यातील ७ मे ते १५ मे, २०१९ या दरम्यान अचानक कमी झालेल्या जनावरांच्या संख्येचे देयक अदयाप वितरीत करण्यात आलेले नाही व आष्टी तालुक्यातील ज्या चारा छावण्यांमध्ये त्रुटी आढळुन आल्या त्या छावण्यांना मे महिन्यातील देयकावर एकूण रुपये १,०८,५०,२८९/- रुपये दंड आकारण्यात आलेला आहे.
(३) असा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनेक ठिकाणी पाणंद रस्ते अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४२) १३९३८५ (१०-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक ठिकाणी शिवारातून शेतमालाची किंवा शेतीच्या अवजारांची ने आण करण्यासाठी पाणंद रस्ते तयार केलेले असून अनेक पाणंद रस्ते हे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अपूर्णावस्थेत असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करून पक्के रस्ते बनविण्यासह सदरच्या कामासाठी दरवर्षी ठराविक निधी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयदत्त क्षीरसागर (०५-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पालकमंत्री पाणंद रस्ता योजने अंतर्गत पाणंद रस्त्यांसाठी मागील वर्षी प्रत्येक जिल्हयास रु.१५० लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आले. तसेच जिल्हा नियोजन समिती कडुन रस्त्याच्या कामासाठी दरवर्षी ठराविक निधी उपलब्ध करण्यात येतो.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील कळमगाव बॅरेज या सिंचन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(४३) १३९४०५ (१२-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात ७८% जंगल असल्याने वन कायद्यामुळे या जिल्ह्यातील अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमगाव बॅरेज हे सिंचन प्रकल्प मंजूर झालेले असून त्याची सिंचन क्षमता २०७३४ हेक्टर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या सिंचन प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत ३७२३५.८६/- रुपये सन २०११-१२ च्या दरसूचीनुसार निश्चित करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत ३७२३५.८६/- रुपये अद्यापपर्यंत अप्राप्त असून सदर सिंचन प्रकल्प पूर्ण होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता किंमत तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०५-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, कळमगांव बॅरेजला अदयाप प्रशासकीय मान्यता प्राप्त नाही.

(३) प्रश्न उद्भभवत नाही

(४) प्रश्न उद्भभवत नाही

(५) सन २०११-१२ च्या दरसुचीवर आधारित रु.३७२.३५ कोटीचा कळमगांव बॅरेजचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर करण्यात आला होता. तपासणीअंती त्रुटी पूर्ततेस्तव राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांच्याकडून सदर प्रस्ताव परत करण्यात आला आहे. त्याची पूर्तता करण्यास्तव अतिरिक्त सर्वेक्षण, अन्वेषण, बॅरेजच्या बुडीत क्षेत्रातील वन जमिनीचे निश्चितीकरण इ. करिता अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. तथापि सद्य:स्थितीत बॅरेजचा पाणी वापर निश्चित झाला नसल्याने पुढील कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**सांगली जिल्ह्यातील कसबे डिग्रजच्या कृषि विदयालयासाठी निधीची तरतूद करुन आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४४) १३९६१९ (०८-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील कृषि विभागाच्या कसबे डिग्रजच्या कृषि विदयालयाची दुरवस्था झाली असून येथे पिण्याचे पाणी, बंद असलेले भोजनालय, शौचालयाची दुरवस्था, रिक्त पदे, इमारतीवर व परिसरात उगवलेली झाडे-झुडपे, सापाचा वावर इ. समस्या असल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सांगली जिल्हयातील कृषि विभागाच्या कसबे डिग्रजच्या कृषि विदयालयासाठी निधीची तरतूद करुन आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (३०-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही. कृषि विद्यालय, कसबे डिग्रज या विद्यालयाच्या ठिकाणी कृष्णा नदीवरील उपसा जलसिंचन योजनेद्वारे विद्यार्थी व कर्मचारी निवासस्थानाकरीता पाण्याची सोय उपलब्ध आहे. मुलींचे भोजनालय सुरु असून सहकारी तत्वावरील मुलांचे भोजनालय त्यांची इच्छा नसल्यामुळे बंद आहे. मुलींचे शौचालय सुस्थितीत असून मुलांचे शौचालय अत्यंत जुने असल्यामुळे दुरुस्तीची आवश्यकता आहे. तसेच विद्यालयातील एकुण ३२ तांत्रिक व अतांत्रिक मंजुर पदांपैकी १६ विविध प्रवर्गातील पदे रिक्त आहेत. उपरोक्त अडचणींबाबत विद्यालयाने कुलगुरु तसेच विद्यापीठ अभियंता महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे. विद्यालयाच्या परिसरातील इमारतीवर कोणतीही जंगली झाडे झुडपे नाहीत. परंतु विद्यालय परिसर हा बागायती क्षेत्रामध्ये असल्यामुळे क्वचित प्रसंगी साप आढळतात.
(२) कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, ता.मिरज, जि.सांगली येथे सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठ अभियंता कार्यालयास प्राप्त झाला आहे. विद्यापीठांतर्गत सर्व विद्यालयांसाठी सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी एकत्रित रु. ४६.९० लाख रुपयांचा प्रस्ताव नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सदर निधी विद्यापीठ अभियंता यांचेकडे वर्ग करण्यात येतो. तसेच विद्यापीठ अभियंता, राहुरी यांनी अत्यावश्यक सोयीसुविधा पुरविण्यासाठी दुरुस्तीची कामे तात्काळ सुरु केलेली आहेत. तथापि महापुरामुळे सध्या कामे बंद आहेत. तसेच कार्यकारी परिषद सदस्य यांना अडचणींची माहिती देण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत विद्यालयास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### ग्लायफोसेटचा वापराने कॅन्सर होत असल्याबाबत

**(४५) १३९८५३ (१०-०७-२०१९). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी ग्लायफोसेट निर्मिती करणाऱ्या कंपन्यांकडून सुमारे ७०० कोटी रुपयांचे ३५ लाख लिटर तणनाशकांचा वापर शेतात करतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्लायफोसेटच्या वापरामुळे कर्करोग होत असल्याचे हजारो दावे अमेरिकेच्या न्यायालयात दाखल झाले असून न्यायालयाने कर्करोगाचा मुद्दा मान्य करुन नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ग्लायफोसेटच्या बंदीच्या वादग्रस्त फायली पुन्हा उघडण्याचा निर्णय घेऊन कर्करोगग्रस्तांची माहिती गोळा करण्याचे आदेश देऊन ग्लायफोसेटवर बंदी घालण्याच्या नोटीसा उत्पादक कंपन्यांना दिल्या असून, ग्लायफोसेटची निर्मिती आणि शोधात अग्रेसर असलेल्या मोन्सॅन्टोलादेखील नोटीस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कर्करोगग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याबाबत कार्यवाही करुन ग्लायफोसेट निर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. अनिल बोंडे (०७-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) अमेरिकन न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबतची अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

(३) नाही.

ग्लायफोसेटवर बंदी घालण्याच्या नोटीसा उत्पादक कंपन्यांना बजावण्यात आलेल्या नाहीत. तथापि, ग्लायफोसेटच्या वापरामुळे कर्करोगासारखे घातक परिणाम आरोग्यावर होतात किंवा कसे, याबाबत राज्यातील सर्व कृषि विद्यापीठे, संशोधन संस्था, सामाजिक संस्था, तसेच, विविध शेतकरी मंडळ/ गट यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

(४) वरील सर्व संस्थांचे ग्लायफोसेट बाबतचे अभिप्राय विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील ओखी वादळामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई अदा करण्याबाबत

**(४६) १३९९६५ (११-०७-२०१९). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात 'ओखी' नामक वादळामुळे दिनांक ५, ६ आणि ७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास वसई समुद्रकिनारपट्टीवरील मच्छिमार बांधवांची घरे, शेती, झाडे, मच्छिमार बांधवांच्या बोटी, मासळी सुकविण्याचे शेड इत्यादींचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा प्रशासनाकडून याप्रकरणी सुमारे ८५० हून अधिक नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्यात आले असुन १ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवुनही अद्याप त्यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वसई तालुक्यातील ओखी वादळामुळे नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१९-०९-२०१९) :** (१) दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ रोजी आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील घरे, मच्छिमारांचे जाळे यांचे नुकसान झाल्याचे दिसून आले.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक १२.०७.२०१८ अन्वये दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ रोजी आलेल्या ओखी चक्रीवादळामुळे मच्छिमार बोटींचे व जाळींचे झालेल्या नुकसानीसाठी निधी वितरित करण्याबाबतची मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यातील १९ मच्छिमारांना जाळींच्या झालेल्या नुकसानीसाठी रु. ४९४००/- इतकी मदत वितरित करण्यात आली आहे. तसेच ओखी चक्रीवादळामुळे पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील अर्नाळा किल्ल्यातील १९ मच्छिमारांच्या घरांच्या झालेल्या नुकसानीसाठी रु. १२,७६,५००/- एवढी नुकसानभरपाई देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भंडारा (जि. भंडारा) येथील जिल्हा सामान्य रूग्णालयातील डॉक्टरांच्या गैरवर्तवणूकीबाबत

**(४७) १४०००९ (१२-०७-२०१९). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा (जि.भंडारा) येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. माधुरी थोरात व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बडे यांनी मुख्यालयी न राहणे, रुग्णाची हेळसांड करणे, तसेच त्यांना लगेच नागपूरच्या रुग्णालयात रेफर करणे, लोकप्रतिनिधीसोबत गैरवर्तणूक करणे याबाबत लेखी पत्राद्वारे मा. मुख्यमंत्री, उर्जा व नवीनीकरण तथा पालक मंत्री, भंडारा व सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास व रुग्णालयातील १ ते ११ मुद्याच्या दैनाअवस्थेसंदर्भात आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१८ रोजी व आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांना दिनांक २९ ऑक्टोंबर, २०१८ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधीद्वारे तात्काळ चौकशी करून कारवाई करण्यासंदर्भातचे निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने सदर प्रकरणाची चौकशी करणेसंदर्भात आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी लेखी पत्राद्वारे आदेश निर्गमित केले व त्यांच्या कार्यालयाने त्यांचे पत्र जा.क्र. ४१८३/१८ दि. ३०/१०/२०१८ रोजी आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांना तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आरोग्य उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांनी ५ सदस्यीय चौकशी समिती त्यांचे जावक पत्र क्र. २८५४७ - ५० /२०१८ दि. २९/१८/२०१८ रोजीच्या पत्रानुसार गठीत करून सदर प्रकरणाची घटनास्थळ जिल्हा सामान्य रूग्णालय भंडारा येथील १ ते ११ मुद्याच्या अनुषंगाने दैनाअवस्थेसंदर्भात व लोकप्रतिनिधी सोबत तसेच रुग्णांसोबत गैरवर्तणूक व गैरकारभाराची चौकशी केली वा करण्यात येत आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने संबंधित दोषी डॉक्टर अधिकारी व कर्मचाऱ्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांनी चौकशी करणेकरीता पांच संदस्यीय समिती गठीत केली असून, सदर प्रकरणी गठीत समितीचे समन्वयक जिल्हा शल्य चिकित्सक, वर्धा यांचेकडून दिनांक ०१.०६.२०१९ रोजी चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत:-
• नोंदणी विभागामध्ये खिडक्या वाढविणे गरजेचे आहे. सोबतच स्त्री, पुरूष, स्वातंत्र सैनिक, जेष्ठ नागरीक, दिव्यांग व बालके ह्याकरिता वेगवेगळ्या नोंदणी खिडक्या असणे गरजेचे आहे.
• प्रत्येक तज्ञ डॉक्टरांनी वेळापत्रक पाळण्यात यावे व तश्या प्रकारचे वेळापत्रक अति.जिल्हा शल्य चिकित्सक यांनी तयार करावे.
• व्यवसायरोध भत्ता घेत असलेल्या व न्यायालयात प्रकरण असलेल्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे व्यवसाय रोध भत्ता बंद करण्यात यावा. तसेच पूर्वी दिलेल्या व्यवसाय रोध भत्त्याच्या रकमा परत घेण्याकरिता वरिष्ठांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.
• डी.एम.ओ.ची ड्युटी लावण्यात यावी, जेणेकरून २४ तास रूग्णांना सेवा देता येईल.
• महिन्यातून जिल्हा शल्य चिकित्सक ह्यांनी सभा घेऊन कर्मचाऱ्यांची तक्रार असल्यास, त्वरित सोडविण्यात यावी
• डायलिसीस विभागाचा आढावा घेऊन आवश्यक व नियमानुसार मनुष्यबळ ठेवण्यात यावे. तसेच नियमितपणे यंत्रसामुग्रीचा आढावा घेऊन त्वरित कार्यवाही करावी.
समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव येथे कृषि विद्यापीठ स्थापन करण्याबाबत**

**(४८) १४१३११ (०६-०७-२०१९). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे विभाजन करण्याबाबत शासनाने किती व कोणत्या समित्या नेमल्या आहेत,

(२) तसेच, या विद्यापीठाचे विभाजन करुन उत्तर महाराष्ट्रात जळगांव येथे व पूर्व विदर्भात चंद्रपूर येथे स्वतंत्र विभाजीत कृषि विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत डॉ.वेंकटेश्वरलु समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव यांनी सर्व संबंधितांची दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेतलेल्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (३०-०९-२०१९) :** (१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन विद्यापीठांचे विभाजन करण्याबाबत शासनाने दोन समित्या नेमल्या आहेत.

कृषि व पदुम विभागाच्या दि. १९/८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ. वाय.एस.पी. थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या अहवालावर कार्यवाही करण्याकरीता काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती घेणे व दोन विद्यापीठांचे विभाजन करण्याकरीता लागणारा आवश्यक तपशील प्राप्त करुन शासनास सादर करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १४ मे, २०१५ अन्वये डॉ.वेंकटेश्वरल्लु, तत्कालीन कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी समिती गठीत करण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कृषि विद्यापीठांच्या विभाजनाच्या अनुषंगाने तत्कालीन मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९.४.२०१७ रोजी आयोजित बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कृषि परिषद, पुणे कार्यालयास कळविण्यात आले होते. या बैठकीच्या इतिवृत्तामधील मुद्दा क्र.४-नविन कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र, त्याअंतर्गत येणारी सध्याची महाविद्यालये व त्यासाठी आवश्यक निधीबाबतचा सविस्तर प्रस्ताव, आणि मुद्दा क्र.५-नविन विद्यापीठांतर्गत संशोधन केंद्राची पिकांचा विचार करुन विभागणी करताना तेथील पिकांचा विचार करुन त्यानुसार प्राथम्यक्रम ठरवावा. दोन मुद्यांच्या अनुषंगाने कृषि परिषद कार्यालयाने सविस्तर अहवाल विद्यापीठाकडून मागविला आहे. सदरचा अहवाल अद्यापपावेतो विद्यापीठाकडून प्राप्त झालेला नाही. त्यामुळे राज्य कृषि परिषदेच्या स्तरावर हा प्रस्ताव विचाराधीन आहे. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने पुनश्च तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**रेवसा (ता.जि.अमरावती) येथील पुरग्रस्त पुनर्वसनचे २२७ प्लॉट असल्याने रोड नालीचे बांधकाम व विद्युत पुरवठा करण्याबाबत**

**(४९) १४१६२८ (११-०७-२०१९). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवसा (ता.जि. अमरावती) येथील पुरग्रस्त पुनर्वसनचे २२७ प्लॉट असल्याने रोड नालीचे बांधकाम व विद्युत पुरवठा करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०८-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) सन २००७ मध्ये अमरावती जिल्ह्यातील अतिवृष्टी/पुरामुळे बाधित झालेल्या रेवसा येथील रस्ते व नाली बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. रेवसा येथील लोकांच्या घरांचे बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**अमरावती जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातंर्गत वाहने पुरविण्यासाठी काढलेल्या ई-निविदाबाबत**

**(५०) १४१९३९ (१५-०७-२०१९). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातंर्गत वाहने पुरविण्याबाबत ई-निविदा सन २०१६-१७ मध्ये काढण्यात आला असुन उक्त ई-निविदा सन २०१८ साठी लागू करण्यात आल्याने बहुतांश वाहने निकामी व परवाना संपलेली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०१९) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयामध्ये सन २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत एकूण ३४ वाहने पुरविण्याबाबत ई-निविदा करण्यात आली होती. सदर ई-निविदेला नियमानुसार २ वेळा मुदतवाढ देऊनही एकच निविदा आल्याने सदर निविदाद्वारे प्राप्त कागदपत्रांची तपासणी सेवा अभियंता, जिल्हा कार्यशाळा परिवहन, सामान्य रुग्णालय अमरावती यांचेकडून तपासणी करुन दिनांक १.३.२०१७ रोजी मे. रत्नम टुर्स ॲण्ड ट्रान्सपोर्ट, परतवाडा यांना आदेश देण्यात आला. सदरचा आदेश दिनांक ३१.३.२०१७ पर्यंत देण्यात आला.
त्यानंतर आरबीएसके कार्यक्रमामध्ये वाहनाअभावी अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात आली.
त्यानंतर ज्या जिल्हयांमध्ये सन २०१७-१८ साठी वाहनांची जिल्हा स्तरावरुन निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली नाही अशा वाहनांच्या कत्रांटदारांना ६ महिन्यांपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.
मार्च २०१९ मध्ये ७ वाहनांचा परवाना कालबाहय असल्याचे आढळून आले परंतू कोणतेही वाहन निकामी दिसून आले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.